Date: 16.04.2024

To,
BSE Limited
Department of Corporate Services
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai – 400 001

**Scrip Code: 514330**

**Sub: Newspaper Advertisement for NCLT Convened Meeting of Unsecured Creditors of One Global Service Provider Limited.**

**Ref: Order of the Hon'ble NCLT, Mumbai, dated 13th March, 2024, in the matter of Scheme of Amalgamation of Plus Care Internationals Private Limited ("Transferor Company") with One Global Service Provider Limited ("Transferee Company'') and their respective shareholders and creditors under section 230 to 232 of the Companies Act, 2013.**

Pursuant to Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirement) Regulation, 2015, we submit herewith a copy of the publication of notice published in newspapers, viz. Business Standard, in English on 16th April, 2024, and Tarun Bharat, in Marathi on 16th April, 2024, intimating about the NCLT Convened meeting of Unsecured Creditors of One Global Service Provider Limited scheduled to be held on Thursday, 9" May, 2024 at 3:00 p.m. through video conferencing / other audio-visual means. The above is also available on the website of the Company viz. https://www.1gsp.in/

Please take the above on your records.

**For, ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED**

SANJAY LALBHADUR UPADHAYA
Digitally signed by SANJAY LALBHADUR UPADHAYA
Date: 2024.04.16 17:16:31 +05'30'

**SANJAY UPADHAYA**
**MANAGING DIRECTOR**
**DIN: 07497306**

**PLACE: MUMBAI**

## थोडक्यात

### ठाण्यात संस्कृत संभाषण शिबिराचे आयोजन

**ठाणे :** ‘संस्कृत भारती’ कोकण प्रांताद्वारे संस्कृत संभाषण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये संस्कृत शब्द, वाक्यरचना, गीते, गोष्टी यांद्वारे संस्कृत शिकवण्यात येणार आहेत. हे शिबीर दि. २२ एप्रिल ते १ मे या कालावधीत ठाणे पूर्व स्टेशनजवळील मंगला हायस्कूल, तळमजला येथे सायंकाळी ४ ते ६ या वेळेत होईल. हे शिबीर निःशुल्क असून या संदर्भात अधिक माहितीसाठी ८१०४७१५८९१, ८२८६०३८७८७ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन ‘संस्कृत भारती’ कोकण प्रांतचे प्रचारप्रमुख महेश परळकर यांनी केले आहे.

### नवरात्रीत श्रीराम मंदिरात श्रीरामरक्षा स्तोत्र पठण

**पालघर :** सध्या चैत्र नवरात्र सुरू असून या नवरात्रीत गुढीपाडवा ते श्रीराम नवमी असे नऊ दिवस श्रीराम मंदिरात श्रीरामरक्षा स्तोत्राचे पठण ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. यासाठी सकाळी ७ वाजता मोठ्या संख्येने गावकरी मंदिराकडे धाव घेत आहेत. वसई पूर्वेतील एकमेव सुमारे १६० वर्षांहून अधिक वर्षांपासूनचा इतिहास असलेल्या खानिवडे श्रीराम मंदिरात मागील काही दशकांपासून श्रीरामरक्षा पठण केली जाते. गावातील महिलांचा रामरक्षा पठणसाठी मोठा सहभाग असतो. या नवरात्रीत गावातील जास्तीत जास्त रहिवासी नऊ दिवस सोवळ्यात राहतात. श्रीरामनवमी, गोपाळकाला, अजा एकादशी, श्रीगणेश उत्सव आदी अनेक धार्मिक कार्यक्रमांसह मंदिरातील रोजची पूजा अर्चा, साफसफाई व देखभाल ही सारे गावकरी मिळून करतात. सुमारे १५० वर्षांपासून श्रीरामनवमीला या मंदिरात होणाऱ्या श्रीरामजन्मोत्सव कीर्तन सोहळ्याला परिसरातील गावचे रहिवासी मोठ्या प्रमाणात उपस्थित असतात, तर नवमीला येथे पहाटेपासून अभ्यंगस्नान, काकड आरती, भजन, कीर्तन यासह सारे षडोपचार केले जातात, तर यावेळी येथे मोठी जत्रा भरते.

# ठाणे लोकसभेवर भाजपचा अधिकार रास्तच!

## प्रवीण दरेकर यांचे सूचक वक्तव्य

**ठाणे, दि.१५ : प्रतिनिधी**



रामभाऊ म्हाळगी, रामभाऊ कापसे अशी ठाणे लोकसभेला भाजपची परंपरा आहे. ठाण्यात भाजपचे सर्वाधिक आमदार असून कार्यकर्त्यांची मोठी फळी सज्ज आहे. त्यामुळे ठाणे लोकसभेची मागणी करणे हा भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा अधिकार आहे, असे वक्तव्य भाजपचे विधान परिषदेचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी केले आहे. दरेकर यांच्या या विधानामुळे ठाणे लोकसभेसाठी भाजपचा दबाव अधिक वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

ठाण्यातील वर्तकनगर येथील भाजपच्या विभागीय कार्यालयाला नुकतीच प्रवीण दरेकर यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी हे विधान केले. ठाणे आणि कल्याण लोकसभेच्या जागेसाठी भाजप आणि शिवसेनेमध्ये संघर्ष सुरू होता. यामध्ये कल्याणच्या जागेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी स्वतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर करून या वादावर पडदा टाकला. या पार्श्वभूमीवर ठाण्याच्या जागेसाठी भाजपचा आग्रह कायम आहे.

राज्यात तीन ते चार ठिकाणी उमेदवारी निश्चित होणे शिल्लक आहे. तीन पक्ष एकत्र येऊन काम करतात. त्यावेळी उमेदवारीबाबत प्रश्न निर्माण होत असतात. आमचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा ठाणे लोकसभेच्या जागेसाठी टोकाचा आग्रह आहे. ठाणे हे भाजपसाठी महत्त्वाचे आहे. आमच्या कार्यकर्त्यांनी ठाणे जिल्ह्यात संघटन उभे केले आहे. त्यामुळे ठाणे लोकसभेची मागणी करणे कार्यकर्त्यांचा अधिकार असल्याचे दरेकर म्हणाले.

रामभाऊ म्हाळगी, रामभाऊ कापसे हे ठाण्याचे खासदार होते. सध्या ठाण्यात आमदार, नगरसेवक, कार्यकर्त्यांची मोठी फळी उभी राहिली आहे. आम्हाला लोकसभेची जागा मिळेपर्यंत कार्यकर्ते आग्रह धरतील. जर ही जागा भाजपला मिळाली, तर शिंदे यांचे कार्यकर्ते ताकदीने काम करतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### ठाणेकर भाजपच्या पाठीशी : फडणवीस

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच भाजपच्या याच कार्यालयाचे लोकार्पण करण्यात आले. तेव्हा त्यांनीही ठाण्यात भाजपचे काम सातत्याने मजबुतीने वाढले असून आज संपूर्ण ठाणे विभागामध्ये भाजप एक प्रमुख पक्ष म्हणून पुढे येत आहे. ठाणेकर अतिशय ताकदीने भाजपच्या पाठीशी आहे. त्यामुळेच भाजपकरिता ठाणे महत्त्वाचे असल्याचे फडणवीस म्हणाले होते, तर आता दरेकर यांनीही ठाणे लोकसभेच्या जागेबाबत महत्त्वाचे विधान केले आहे.

# महायुतीतील पक्षांची ही कसोटी यात आपण निश्चितपणे उतरु!

## महासभेत सुनील तटकरेंचा झंझावात

**माणगाव/निजामपूर, दि. १५ : प्रतिनिधी**

महायुतीतील तिन्ही पक्षांच्या जीवनातील राजकीय परीक्षेची ही कसोटी आहे. त्या कसोटीला आपण निश्चितपणे उतरू, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांनी माणगाव-निजामपूर येथील महायुतीच्या जाहीर सभेत व्यक्त केला.

राजकारणात फेरबदल होत असतात, समीकरणे बदलत असतात, आपण राजकीय विरोधक यावेळी एकत्र आलो आहोत, हे नवीन राजकारण देशाच्या हिताचे आहे. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदा निवडणूक लढली जात आहे, तर अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पहिल्यांदा निवडणूक लढत आहे. देवेंद्र फडणवीस भाजपच्या नेतृत्वाखाली अनेक निवडणुका लढवत आले आहेत, असेही तटकरे यावेळी म्हणाले. लोकसभा निवडणुकीत ९० टक्क्यांच्या पुढे परीक्षेत पास होणार आहोत आणि विधानसभेच्या परीक्षेत दोन टक्के जास्त पास होणार आहोत. केंद्र व राज्य सरकारच्या योजना एकत्रितपणे राबवायच्या हे धोरण घेऊन आपण पुढच्या कालावधीत काम करत राहूया, असे आवाहन तटकरे यांनी केले. या लोकसभा निवडणुकीत जेवढे मताधिक्य मिळेल, त्यापेक्षा जास्त मताधिक्य भरतशेठ गोगावले यांना विधानसभेत देण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन तटकरे यांनी दिले. या सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनील तटकरे, शिवसेना मुख्य प्रतोद आमदार भरतशेठ गोगावले, युवा नेते विकास गोगावले, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, महिला आघाडी प्रमुख नीलिमा घोसाळकर, राजाभाऊ रणपिसे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बच्चे कंपनीचा नारा ‘अब की बार ४०० पार’

**कल्याण, दि. १५ : प्रतिनिधी**



२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत इतिहास घडून पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांची निवड झाली. त्या काळात ‘अब की बार मोदी सरकार’ ही घोषणा बच्चे कंपनीत लोकप्रिय ठरली होती, तर आता ‘अब की बार ४०० पार’या घोषणेलाही शाळकरी मुलांमध्ये पसंती मिळाली. भिवंडी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार व केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी रविवारी कल्याणमधील सोसायट्यांच्या केलेल्या दौऱ्यात बच्चे कंपनीने उत्स्फूर्तपणे ‘अब की बार ४०० पार’चा नारा दिला. यावेळी कपिल पाटील यांनीही बच्चे कंपनीला घोषणांमध्ये साथ दिली.

# कपिल पाटील-राज ठाकरे भेट

**कल्याण, दि. १५ : प्रतिनिधी**



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भिवंडी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार व केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांनी मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.

लोकसभा निवडणुकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी मनसेने महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला आहे. या पार्श्वभूमीवर कपिल पाटील यांनी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची दादर येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी दिलेल्या पाठिंब्याबद्दल कपिल पाटील यांनी आभार मानले. यावेळी निवडणुकीतील प्रचाराबाबत राज ठाकरे यांनी काही सूचना केल्या. यावेळी मनसेचे आमदार राजू पाटील, अविनाश जाधव, अभिजीत पानसे आणि डी. के. म्हात्रे आदी उपस्थित होते.

# मातेच्या दरबारात जवानांना आदरांजली

**ठाणे :** ‘संदेशे आते है..., मेरा रंग दे बसंती...’, अशा देशभक्तीपर गीतांनी देशाच्या सीमेवर लढणाऱ्या तसेच, शत्रूसोबत लढताना हुतात्मा झालेल्या भारतीय जवानांना ठाणे पूर्वेतील श्री अंबे मातेच्या दरबारात सांगीतिक आदरांजली वाहण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने कोपरीतील संत तुकाराम मैदानात धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठानच्यावतीने सुरू असलेल्या चैत्र नवरात्र उत्सवात नऊ दिवस वेद मंत्राच्या घोषात नवकुंडात्मक सहस्त्रचंडी महायाग सुरू आहे. तसेच, मंत्रमुग्ध करणाऱ्या सांस्कृतिक, भक्तीमय कार्यक्रमांना रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे. रविवार, दि. १४ एप्रिल रोजी सहाव्या दिवशी प्रसिद्ध गायक सोनू निगम, श्रेया घोशाल आणि अर्जित सिंग यांची गाणी युवा ‘रॉकस्टार’ गायकांनी सादर केली. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित महिलांनी हिंदी, मराठी भाषेतील सुमधूर गीतांवर फेर धरून आनंद लुटला.

# मतदान जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी

**पनवेल, दि. १५ : प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर ‘स्वीप’ कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी सोमवार, दि. १५ एप्रिल रोजी टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये प्रभात फेरी घेण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या मतदान जनजागृतीपर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शिवाय आशा सेविकांनी ३३ मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये विविध ठिकाणी महिलांच्या बैठका घेऊन मतदान जनजागृती केली.



निवडणुकीच्या निमित्ताने ‘स्वीप’ कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) अमंलबजावणी ३३ मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदार संघांतील महापालिका कार्यक्षेत्र तसेच पनवेल ग्रामीण भागात केली जात आहे. आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ व स्वीप पथक प्रमुख अधिकारी मुख्य अभियंता संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती कार्यक्रम राबविले जात आहेत.

गेल्या काही दिवसापासून महापालिकेच्यावतीने व तहसील कार्यालयाच्यावतीने विविध शाळांच्या माध्यमातून प्रभातफेरीच्या माध्यमातून मतदान ३३ मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदार संघांतर्गत मतदान जनजागृती केली जात आहे. सोमवारी टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये प्रभात फेरी घेण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या मतदान जनजागृतीपर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ‘आशा’सेविकांनी शिवाजी नगर, पेंधर, खारघर, सेक्टर-१६ कामोठे, धाकटा खांदा अशा विविध याठिकाणी महिलांच्या बैठका घेऊन त्यांना मतदानाचे महत्त्व पटवून सांगितले. याचबरोबर ८५ वर्षांवरील नागरिक व दिव्यांग यांना एकत्रित करून त्यांच्यामध्ये मतदान जनजागृती करण्यात आली.

# नांगरमोडाच्या स्वयंसेवकांकडून डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी**

नांगरमोडा, जव्हार येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दत्तगुरु संयुक्त शाखेत रविवार, दि. १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहपूर्वक साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून वयम चळवळीचे अध्यक्ष विनायक थाळकर उपस्थित होते. न्याहाळे उपखंडातील स्वयंसेवक व इतर नागरिकही या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर वक्त्यांनी ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य आणि समाजासाठी त्यांचे योगदान’ या विषयावर उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिकवणी आणि विचारांचे पालन करून समाजात समानता आणि बंधुता निर्माण करण्याचे आवाहन केले.

# कल्याण येथील अखिल भारतीय साहित्य परिषदेचा मेळावा संपन्न

**कल्याण, दि. १५: प्रतिनिधी**

अखिल भारतीय साहित्य परिषद कल्याणच्यावतीने वर्ष प्रतिपदा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व रामनवमीच्या निमित्ताने, १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी साहित्यिक मेळाव्याचे आयोजन केले होते.



नमस्कार मंडळ कल्याण येथे झालेल्या या मेळाव्यात प्रा. प्रकाश पाटील यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर तसेच यशवंत वैद्य यांनी गीत रामायणावर माहिती दिली. निलांबरी बापट, कौसल्या पाटील, शुभांगी भोसले, मंगला कांगणे, सुनील म्हसकर, मदनकुमार उपाध्याय, संजीवनी जगताप, रामचंद्र साहू, सुमित्रा गुप्ता, सत्यभामा सिंग, कवी सरल मध्यप्रदेश यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वर्ष प्रतिपदा, श्रीराम प्रभू यांच्यावरील आपल्या रचना सादर केल्या.

यावेळी राष्ट्रीय मंत्री डॉ. दिनेश प्रताप सिंग यांच्या हस्ते मराठी कवींना भारतीय संविधान भेट देण्यात आले.

डॉ. शामसुंदर पाण्डेय यांनी सर्व कविता व भाषणांचा आढावा घेऊन आपले विचार मांडले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी कोकण प्रांत कार्याध्यक्ष प्रवीण देशमुख हे होते, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंत्री संजय द्विवेदी यांनी केले.


## ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED

CIN: L74110MH1992PLC367633

Regi. Add. : 6th Floor, 601 E Wing, Trade Link Building, B & C Block Senapati Bapat Marg, Kamala Mill Compound, Lower Parel (W) Delisle Road, Mumbai, Maharashtra - 400013.
Telephone : 8657527323 Website : www.1gsp.in E-mail : 1connect@1gsp.in

**FORM NO. CAA. 2**

[Pursuant to Section 230 (3) and rule 6 and 7)]

**Company Petition No CA (CAA) 11 (MUM) of 2024 Applicant(s)**

**Notice and Advertisement of notice of the meeting of creditors**

Notice is hereby given that by an order dated the 13.03.2024 and certified true copy received on 18.03.2024, the Mumbai Bench of the National Company Law Tribunal has directed a meeting to be held of unsecured creditors of One Global Service Provider Limited for the purpose of considering, and if thought fit, approving with or without modification, the compromise or arrangement proposed to be made between Plus Care Internationals Private Limited amalgamating with One Global Service Provider Limited under the provisions of Section 230 to 232 of the Companies Act, 2013 and the other applicable provisions thereof and applicable rules thereunder.

In pursuance of the said order and as directed therein notice is hereby given that a meeting of unsecured creditors of One Global Service Provider Limited held through video conferencing on Thursday, 9th May, 2024 at 3:00 p.m.

Notice of the meeting, copy of scheme along with the explanatory statement under Sections 230 to 232 read with section 102 and other applicable provisions of the Act and Rule 6 of the Companies (Compromises, Arrangements and Amalgamations) Rules, 2016 can also be accessed/ downloaded from the Company's website https://www.1gsp.in/ and from the website of the Stock Exchange i.e. BSE Limited respectively. The copies of the said compromise or arrangement or amalgamation, and of the statement under section 230 can be obtained free of charge at the registered office of the company at 6th Floor, 601 E Wing, Trade Link Building, B & C Block Senapati Bapat Marg, Kamala Mill Compound, Lower Parel (W) Delisle Road, Mumbai, Maharashtra – 400013 or by emailing the company at 1connect@1gsp.in , upto the date of the meeting.

The cut-off date for e-voting (including remote e-voting) and time period for the remote e-voting of the aforesaid meeting is as under:

| | |
|---|---|
| Cut-off date | Thursday, 29th February, 2024 |
| Remote e-voting start date and time | Monday, 6th May, 2024 from 9.00 a.m. (IST) |
| Remote e-voting end date and time | Wednesday, 8th May, 2024 upto 5.00 p.m. (IST) |

The facility for casting vote by remote e-voting would be disabled after the end time, as mentioned above, for the meeting.
The Tribunal has appointed Mr. Sanjay Upadhaya as chairperson of the said meeting. The above-mentioned compromise or arrangement or amalgamation, if approved by the meeting, will be subject to the subsequent approval of tribunal.
The results of the meeting shall be announced by the Chairperson of the meeting, within 2 working days of the conclusion of the meeting upon receipt of Scrutinizer's report and the same shall be displayed on the website of the company at https://www.1gsp.in/, besides being communicated to stock exchange i.e. BSE Limited.

Dated : 15th April, 2024
Place : Mumbai

For, **One Global Service Provider Limited**
Sd/-
**Sanjay Upadhaya (Chairperson)**
**DIN: 07497306**


# पंतप्रधानांमुळे भारत विकसित राष्ट्र होईल : चंद्रशेखर नेने

**डोंबिवली, दि. १५ : प्रतिनिधी**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे २०४७ साली भारत एक विकसित राष्ट्र आणि जागतिक महासत्ता होणार आहे. युएन, ‘जी २०’मधील प्रभावी राष्ट्र म्हणून भारत देश ओळखला जाईल. अन्नधान्य, पाणी व ऊर्जा या गरजा परिपूर्ण रितीने भागविणारा देश होईल. सर्वासाठी चांगले आरोग्य सुविधा असतील आणि पर्यावरणीय संतुलित असा देश म्हणून भारताकडे पाहिले जाईल. इतक्या दिवसांत महिलांचा कोणीही विचार केला नव्हता. पण मोदी सरकारच्या काळात महिलांना गॅस सेवा पुरविण्यात आली. त्यामुळे महिलाचे श्वसनांचे आजार कमी झाले. घरोघरी पाण्याची नळाद्वारे सोय करून त्यांचा वेळ आणि श्रम वाचवले. त्यामुळे महिला राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सहभागी होत आहे, असे मत आंतरराष्ट्रीय घडामोडीचे अभ्यासक चंद्रशेखर नेने यांनी व्यक्त केले.

भारत विकास परिषद डोंबिवली शाखा यांच्यातर्फे रजत वर्ष (२०२३-२४) समापन समारोह तथा दायित्व ग्रहण समारोहाचे आयोजन वक्रतुंड सभागृहात करण्यात आले होते. यावेळी सशक्त भारताचे जगातील उंचावलेले स्थान यावर ते बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्षा अॅड. वृंदा कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौरभ सोहोनी, स्नेहल दीक्षित, मेघा प्रभुणे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सुष्मिता ताम्हणकर यांनी करून दिला.

### भाजपकडून बाबासाहेबांच्या प्रतिमेला वंदन



**नवी मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ऐरोली येथील त्यांच्या स्मारकात लोकनेते आमदार गणेश नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्यासह इतर मान्यवरांनी त्यांच्या प्रतिमेला वंदन केले.

# पारा वाढला...तापमान ४२ अंशावर!

**ठाणे, दि. १५ : प्रतिनिधी**

अरबी समुद्रातून आर्द्रतायुक्त वारे वाहत असल्यामुळे हवेत आर्द्रतेचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्याला उष्ण लहरीचा (हीट वेव) तडाखा बसत आहे. सोमवार, दि. १५ एप्रिल रोजी तापमानाचा पारा ४१.०६ अंशावर पोहोचल्यामुळे ठाण्यात अक्षरश: वैशाख वणवा पेटल्याची अनुभूती नागरिक घेत आहेत. गेल्या पाच दिवसांपासून उन्हाचे चटके बसायला सुरुवात झाली असून तापमानात वाढ झाली आहे. दुपारी ११ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कडक उष्णता जाणवत आहे. तेव्हा, उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून सर्दी, खोकला, डोकेदुखी आणि उष्माघाताच्या आजारामध्ये वाढ होत आहे.



### पशुपक्ष्यांनाही ‘चटके’

उष्म्याने एकीकडे नागरिक हैराण झाले असताना वाढत्या उष्णतेचे चटके पशुपक्ष्यांनाही बसत आहेत. उन्हाच्या कडाक्यामुळे प्राण्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. उष्माघाताचा त्रास झालेल्या पाळीव प्राण्यावर उपचारासाठी शरीरातील तापमान जास्त असल्याने वाढलेल्या उन्हाचा त्रास पशुपक्षी आणि प्राण्यांना अधिक भेडसावत असल्याचे पशुवैद्यकांनी सांगितले.

वाढत्या नागरीकरणाबरोबरच ठाण्यात अनेक प्राकृतिक बदल होत आहेत. टॉवर संस्कृतीमुळे उंचच उंच इमारती उभ्या राहत आहेत. तसेच, मेट्रो व इतर विकास प्रकल्पाची कामे सुरू असल्याने शहरातील नैसर्गिक संपदा लोप पावत आहे. शहरातील बहुतांश रस्ते सिमेंट-काँक्रीटचे बनल्याने मातीशी संपर्क तुटला आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षात तापमानात सातत्याने वाढ होत असल्याचे मत पर्यावरण तज्ज्ञ व्यक्त करतात. गेल्या आठवड्यात उन्हाचा पारा ३८ ते ४१.०६ अंश सेल्सियसच्या वर पोहोचल्याची नोंद ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे करण्यात आली होती.

उन्हाचा तडाखा वाढल्याने नागरिकांच्या दैनंदिन कामांच्या वेळादेखील बदलल्या आहेत. दुपारी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत उन्हाची तीव्रता जाणवत असल्याने या कालावधीत रस्त्यावरील वर्दळ रोडावली आहे. उन्हापासून संरक्षण करण्यासाठी नागरिक टोप्या, मोठे रुमाल, स्कार्फ व गॉगल वापरत आहेत. महिलावर्ग तोंडाला स्कार्फ लावून अथवा हातात छत्री घेऊन मार्गक्रमण करीत असल्याचे चित्र दिसत आहे. तापमानाचा हा आलेख हा कमाल (दिवसातील सर्वाधिक) व किमान (सर्वात कमी) असा नोंदवला जातो. सोमवारी सर्वाधिक म्हणजेच कमाल तापमान ४१.०६ अंश सेल्सियस इतकी नोंद झाली.

### काय काळजी घ्याल?

“सध्या दुपारच्या सुमारास तापमानात वाढ होत असल्याने सनस्ट्रोक,डिहायड्रेशन किंवा त्वचेचे विकार जडू शकतात.तेव्हा,शक्यतो बाहेर जाणे टाळावे.किंबहुना,उन्हात फिरताना छत्री किंवा डोक्यात टोपी घालावी.पौष्टिक व पाचक आहारासोबतच भरपूर पाणी प्यावे,जलजन्य पदार्थ म्हणजेच ताक अथवा उसाचा रस,लिंबू सरबत सतत पीत राहावे. उन्हामुळे त्रास जाणवल्यास किंवा आजराची लक्षणे आढळल्यास वैद्यकीय सल्ला घ्यावा.

**- डॉ.कैलास पवार,** जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे

**तापमान तक्ता (अंश सेल्सियसमध्ये)**

| | किमान | कमाल |
|---|---|---|
| ११ एप्रिल २०२४ | २६.०३ | ३८.०१ |
| १२ एप्रिल २०२४ | २६ .०२ | ३६.०४ |
| १३ एप्रिल २०२४ | २५ .०३ | ३४.०९ |
| १४ एप्रिल २०२४ | २५ .०० | ३७.०३ |
| १५ एप्रिल २०२४ | २६.०९ | ४१.०६ |


**निवेदन**

मुंबई तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकूरानुसार प्रसिद्ध होत असतात. जाहिरातदारांबरोबर अथवा व्यक्तींबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान वा हानी झाल्यास त्याबाबत मुंबई तरुण भारत जबाबदार राहणार नाही. आमच्या वाचकांना नम्र विनंती की, त्यांनी जाहिरातदारांबरोबर कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घ्यावी.